**MHRG040039372025**

**दिवाणी किरकोळ अर्ज.नं. १५१२/२०२५**

**स्मिता हिरामण पाटील व इतर**

**विरूध्द**

**कोणीही नाही**

**<u>पाचवे सह. दिवाणी न्यायाधीश वरीष्ठ स्तर, पनवेल, यांचे न्यायालयात</u>**

(पिठासीन अधिकारीः आर.वाय.खंडारे यांचे समक्ष)

**<u>निशाणी ०१ खालील आदेश</u>**

**०१.** अर्जदारांनी प्रस्तुतचा अर्ज १८२७ च्या बॉम्बे रेग्युलेशन क्र. VIII अन्वये वारस दाखला मिळणेकरिता दाखल केला आहे.

**०२.** अर्जदार क्र.०१ हया मयत हिरामण नारायण पाटील यांच्या पत्नी असुन अर्जदार क्र. ०२ व ०३ हे त्यांच्या मुली आहेत. मयत हिरामण नारायण पाटील हे दिनांक ०१/१०/२०२४ रोजी ता. पनवेल, जि. रायगड येथे मयत झाले आहेत. मयत हिरामण नारायण पाटील यांच्या आई नामुबाई नारायण पाटील व वडिल नारायण महादेव पाटील हे साधारणपणे ४० वर्षापुर्वी मयत झालेले आहेत. तसेच मयत हिरामण नारायण पाटील यांचा मुलगा सुंयश हिरामण पाटील हा दि. २९/०२/२०२० रोजी नेदरलॅडस येथे मयत झालेला आहे व तो अविवाहित होता. मयत हिरामण नारायण पाटील यांना अर्जदार क्र. १ ते ३ यांचे व्यतिरिक्त दुसरे कोणीही वारस नाही. मयत हिरामण नारायण पाटील यांच्या नावावर असलेली अर्जाच्या परिच्छेद क्र. २ मध्ये नमुद मालमत्ता आहे व मयत हिरामण नारायण पाटील यांच्या मृत्यूनंतर सदर मालमत्तेतील त्यांच्या हिश्श्याला अर्जदार यांची नांवे वारस म्हणुन लावण्यासाठी वारस दाखला मिळावा म्हणून अर्जदारांनी सदरचा अर्ज दाखल केला आहे.

**०३.** अर्जदारांनी **नि.क्र.०८** प्रमाणे दि.०९/१२/२०२५ रोजी जाहिरनामा व दि. ११/१२/२०२५ रोजी 'किल्ले रायगड' मध्ये जाहिर नोटीस दिल्यानंतर ३० दिवसांत कोणीही सदरच्या अर्जास हरकत घेतलेली नाही.

**०४.** वरील कथनास पुष्टी देण्याकरिता अर्जदार यांनी त्यांचे तर्फे अर्जदार क्र.०१ स्मिता हिरामण पाटील यांचे पुराव्याचे शपथपत्र **नि.क्र.११** वर दाखल केले आहे. त्यांनी मयत हिरामण नारायण पाटील यांच्या मृत्यू प्रमाणपत्राची मुळ प्रत **नि.क्र. १२** वर दाखल केली आहे. तसेच **नि.१३** वर त्यांच्या मुलाच्या मृत्यूच्या दाखल्याची पडताळलेली प्रत दाखल केली आहे. त्यांनी त्यांच्या व त्यांच्या पतीच्या नावावर असलेल्या मालमत्तेच्या नोदणीकृत करारनामा क्र.१४४५/२००७ ची पडताळलेली प्रत **नि.१४** वर दाखल केली आहे. सदर मालमत्तेचे शेअर सर्टीफिकेटची पडताळलेली प्रत **नि.१५** वर दाखल केली आहे. त्यांच्या पतीच्या नावावर असलेल्या माऊली अर्पाटमेंट या मालमत्तेच्या नोदणीकृत करारनामाची पडताळलेली प्रत **नि.१६** वर दाखल केली आहे. सदर मालमत्तेचे शेअर सर्टीफिकेटची पडताळलेली प्रत **नि.१७** दाखल आहे. अर्जदारांनी त्यांच्या आधारकार्डच्या व रेशनकार्डच्या पडताळलेल्या प्रती दाखल केलेल्या आहेत. तसेच मयत सुंयश हिरामण पाटील हा मृत्युसमयी अविवाहित असल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र अर्जदाराने **नि.१९** वर दाखल केले आहे. **आर्टिकल 'अ'** वर वृत्तपत्रात जाहिर करण्यात आलेली नोटीस दाखल करण्यात आलेली आहे. या व्यतिरिक्त **नि.क्र. ०८** वर जाहिरनाम्याची बजावणी करण्यात आलेली आहे. **नि.क्र.१८** नुसार अर्जदार यांनी पुरावा बंद पुरसिस दाखल केली आहे.

**०५.** अर्जदारांनी साक्षीमध्ये सांगितलेल्या कथनास कागदपत्र दुजोरा देतात. **नि.१४ ते १७** वरील करारनाम्यानुसार सदर प्रकरणातील मालमत्ता ही मयत हिरामण नारायण पाटील व अर्जदार क्र. १ यांच्या नावाने असल्याचे दिसुन येते. अर्जदारांनी नि. १९ वर मयत मुलगा सुंयश हिरामण पाटील हा अविवाहित असताना वारल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. अर्जदार क्र.०१ ते ०३ यांच्या व्यतिरिक्त मयत हिरामण नारायण पाटील यांना कोणीही वारस नसल्याबाबतचा अर्जदार यांचा पुरावा विना आव्हानित असल्यामुळे त्यास शंका घेण्याचे कोणतेही कारण दिसून येत नाही. वरील विवेचनावरून अर्जदार हे मयताचे वारस असल्याचे समाधान झाल्यावरून अर्जदार वारसाचा दाखला मिळविण्यास पात्र असल्याने मी खालीलप्रमाणे आदेश पारित करित आहे.

# <u>आदेश</u>

| | |
|---|---|
| १ | अर्ज मंजूर करण्यात येत आहे. |
| २ | अर्जदार क्र.१ **स्मिता हिरामण पाटील,** अर्जदार क्र.२ **प्रणिता महेश पाटील** व अर्जदार क्र. ३ **तृप्ती हिरामण पाटील** हे **मयत हिरामण नारायण पाटील** यांचे अर्जाच्या परिच्छेद क्र. २ मध्ये नमुद मिळकतीमध्ये त्यांच्या हिश्शाचे वारस असल्याचे वारस प्रमाणपत्र मिळकतीच्या मुल्यांकनावर योग्य ती कायदेशीर कोर्ट फी आकारून अर्जदार यांना देण्यात यावे. |
| ३ | सदरचे प्रमाणपत्र हे वारस प्रमाणपत्र (Heirship Certificate) असून ते उत्तराधिकारी प्रमाणपत्र (Succession Certificate) नाही. |
| ४ | नाझर यांनी कायद्याप्रमाणे आवश्यक असलेली कोर्ट फीचा तपशिल द्यावा. |
| ५ | सदर प्रमाणपत्र दिवाणी नियमावली प्रकरण १४ परिच्छेद ३१२ मधील टिपणीस अधीन राहून देण्यात येत आहे. अर्जदार यांनी प्रमाणपत्र प्राप्ती पासून वरील टिपणीस अनुसरून पुढील पूर्तता करावी. |

RAJESH YASHWANTRAO KHANDARE

Digitally signed by RAJESH YASHWANTRAO KHANDARE
Date: 2026.03.10 15:58:00 +0530

**दि. १०/०३/२०२६** **(आर. वाय. खंडारे)**

**पनवेल.** **पाचवे सह दिवाणी न्यायाधिश, व. स्तर,**

**पनवेल.**